# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./२०७/२०२५ दि. २० /०१/२०२५

## परिपत्रक

**विषय:- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तज्ज्ञ सुचीमध्ये नाव समाविष्ट करण्याकरीता आयोगाच्या संकेतस्थळावरील Advisor Portal द्वारे पात्र व्यक्तींकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत असल्याबाबत.**

संदर्भ :- महाराष्ट्र लोकसेवा आयोग पत्र क्र. २२६५/तसूलोसेआ/१९/२०२२१६(गोप-२) दि. २७/१२/२०२४.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय / अशासकीय महाविद्यालये व गोंडवाना विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे शिक्षक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे महाराष्ट्र शासन सेवेत सुयोग्य व पात्र उमेदवारांची निवड करण्यासंदर्भात विविध स्वरुपाच्या स्पर्धा परीक्षा, मर्यादित विभागीय परीक्षा व चाळणी परीक्षा घेण्यात येतात. सदर परीक्षांच्या प्रश्नांचा दर्जा सुयोग्य व उच्चतम काठिण्यपातळी नुसार असणे अपेक्षित असल्याने आयोगास त्या त्या विषयातील तज्ज्ञ अध्यापकीय संवर्गातील सहायक प्राध्यापक , सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य इत्यादींची Paper Setter / Reviewers / Assessors / Moderators या कामाकरीता आवश्यकता असते.

त्याअनुषंगाने विविध विषयांत विशेष ज्ञान व नैपुण्य प्राप्त केलेल्या सर्व तज्ज्ञ व्यक्तींना आयोगाच्या संकेतस्थळावरील **Advisor Portal द्वारे पात्र व्यक्तींकडून केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.**

करीता संदर्भिय आयोगाच्या पत्राचे अवलोकन करुन विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय / अशासकीय महाविद्यालयांतील पात्र व्यक्तींना आणि गोंडवाना विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांतील पात्र शिक्षकांना त्यांचे नाव तज्ज्ञ सुचीमध्ये नाव समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर Advisor Portal या नावाने पोर्टल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. सदर पोर्टलचा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने आवेदन करावे.

सोबत :- आयोगाचे संदर्भिय पत्र.

**(डॉ. अनिल हिरेखण)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. विभागप्रमुख / समन्वयक, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी कृपया सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी संदर्भिय पत्राचे अवलोकन करुन त्यानुसार आपले अधिनस्त शिक्षकांना अवगत करावे व अर्ज करण्यासाठीची कार्यवाही घ्यावी.
५. मा. प्राचार्य, आदर्श पदवी महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग यांनी सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
७. संबंधित संस्था / कार्यालय / विभाग ------------------------------------------------------------
८. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(श्री. देवेंद्र झाडे)**
उपकुलसचिव, आस्थापना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**Email ID :** so-confidential2@mpsc.gov.in **Desk-16 Tel No. 69385987 / 986 / 985**

**गोपनीय**

**क्रमांक-** २२६५/तसूलोसेआ/१९/२०२२/१६(गोप-२) **दिनांक** -२६ डिसेंबर, २०२४.

**प्रति,**

मा. कुलगुरू,
गोंडवाना विद्यापीठ,
M.I.D.C. रोड, कॉम्प्लेक्स गडचिरोली-४२२६०५.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 197 दि. 10/1/25
जावक क्र. ...... दि. ......

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 249 दि. 09/1/25
जावक क्र. 359 दि. 09/1/25

**विषय :-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तज्ज्ञ सुचीमध्ये नाव समाविष्ट करण्याकरीता आयोगाच्या संकेतस्थळावरील Advisor Portal व्दारे पात्र व्यक्तिंकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याबाबत.

**संदर्भ :-** आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २९ नोव्हेंबर, २०२४ रोजीचे पत्रानुसार आयोगाकडून दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांतील मा.कुलगुरू व संचालनालयातील सर्व संचालक यांच्यासमवेत घेण्यात आलेली Video Conference.

**महोदय,**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे महाराष्ट्र शासन सेवेत सुयोग्य व पात्र उमेदवारांची निवड करण्यासंदर्भात विविध स्वरूपाच्या स्पर्धा परीक्षा, मर्यादित विभागीय परीक्षा व चाळणी परीक्षा घेण्यात येतात. सदर सर्व परीक्षा यशस्वीरित्या पार पाडण्याकरीता प्रश्नांचा दर्जा सुयोग्य व उच्चतम काठिण्यपातळी नुसार असणे अपेक्षित आहे. यास्तव आयोगास त्या त्या विषयातील तज्ज्ञ अध्यापकीय संवर्गातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य इत्यादींची Paper setters/Reviewers/Assessors/Moderators या कामाकरीता आवश्यकता असते.

२. आयोगाकडे उपलब्ध असलेली विषयनिहाय तज्ज्ञसूची अद्ययावत करण्याच्या दृष्टीने आयोगाकडून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधील मा. कुलगुरू व संचालनालयांमधील संचालक व सह संचालक यांच्यासमवेत दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी Video Conference आयोजित करण्यात आली होती. या Video Conference मध्ये आयोगाच्या वतीने मा. सदस्य डॉ. देवानंद शिंदे, डॉ. अभय वाघ व डॉ. सतीश देशपांडे यांनी आयोगाची भूमिका मांडली. सदर Video Conference व्दारे आयोगाकडून महाराष्ट्रांतील सर्व विद्यापीठांमधील मा. कुलगुरू व संचालनालयांमधील संचालक/सहसंचालक यांना आयोगाच्या गोपनीय कामाकरीता संबंधीत विषयातील तज्ज्ञ व्यक्तींच्या सेवा उपलब्ध करण्याबाबत विनंती करण्यात आली. तसेच आपल्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये यांच्या आस्थापनेवरील विविध विषयांत विशेष ज्ञान व नैपुण्य प्राप्त केलेल्या सर्व तज्ज्ञ व्यक्तींना आयोगाच्या संकेतस्थळावरील Advisor Portal व्दारे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आपल्या स्तरावरून सुचना देऊन त्यांना प्रवृत्त करण्याबाबत विनंती करण्यात आली.

त्यास अनुसरून संबंधीत विद्यापीठातील मा.कुलगुरू व संचालनालयातील संचालक/सहसंचालक यांनी आयोगाच्या विनंतीस सकारात्मक प्रतिसाद दर्शवून आयोगास संबंधीत विषयांतील तज्ज्ञांची उपलब्धता करून देण्याबाबत आश्वासित केले आहे.

Reg. Registrar
चर्चा झाली
परिपत्रक निर्गमित करावे.
आस्थापना/म.वि.
कार्यवाही
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
9/1/25

३. यापुर्वी आयोगाकडून तज्ज्ञ परीक्षकांचे अर्ज हे ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येत होते. आयोगाकडील प्रचलित तज्ज्ञ सूची अद्ययावत करण्याच्या कार्यपध्दीतीमध्ये कालानुरूप सुधारणा करण्याच्या दृष्टिने आयोगामार्फत तज्ज्ञ परीक्षकांचे अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर Advisor Poartal या नावाने सदरचे Portal उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर Portal चा वापर करून तज्ज्ञ व्यक्तींनी आयोगाकडे अर्ज सादर करावयाचा आहे. सदर प्रणालीव्दारे अर्ज सादर करण्याची टप्पेनिहाय सविस्तर प्रक्रिया https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर Candidate Inforamtion>Announcement and Circular>Press Note for Inviting online applications from persons willing to work as Experts येथे दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रसिध्दीपत्रकामध्ये देण्यात आलेली आहे. (सुलभ संदर्भाकरीता सदर प्रसिध्दीपत्रकाची तिन्ही भाषेतील प्रत सोबत जोडली आहे. )

४. परिच्छेद क्र. २ नुसार सदर प्रसिध्दीपत्रक आपल्या विद्यापीठातील व आपल्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये यांच्या आस्थपनेवरील विविध विषयांत विशेष ज्ञान व नैपुण्य(Expertise) प्राप्त केलेल्या सर्व तज्ज्ञ व्यक्तिंच्या निदर्शनास आणावे व ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आपल्या स्तरावरून त्यांना सूचना देऊन प्रवृत्त करण्यात यावे, अशी आपणास विनंती आहे.

**आपला**

**( प्रदीपकुमार डांगे)**
**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**सहपत्रे :-**

१) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २९ नोव्हेंबर, २०२४ रोजीचे पत्राचे प्रत.

२) दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजीचे प्रसिध्दीपत्रकाची प्रत.